**कौ.हि.म.सं. अर्ज क्र. १८/२०२४**

**निशाणी ५ वरील आदेश**

(सौ. अंकिता संदिप परभणकर वि. श्री. संदीप माणिकचंद परभणकर व इतर)

अर्जदार हिने सदरचा अर्ज जाबदार यांच्याविरुध्द कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ व नियम २००६ चे कलम १२, १८, २० व २२ नुसार दाखल केलेला आहे.

**अर्जदाराचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे –**

२. अर्जदार नं. १ यांचा विवाह जाबदेणार नं. १ यांचे बरोबर दिनांक ३०/११/२०२० रोजी जयदिप मंगल कार्यालय सासवड, ता. पुरंदर, जि. पुणे येथे हिंदू धर्म शास्त्र व जातीरिवाजाप्रमाणे झालेला आहे. जाबदेणार नं. १ हे अर्जदार नं. १ हिचे पती आहेत. जाबदेणार नं. २ हे सासरे, जाबदेणार नं. ३ ही सासू व जाबदेणार नं. ४ ही नणंद आहे. मुळ अर्जातील मजकूर हा या अर्जाचा भाग समजण्यात यावा.

३. अर्जदाराने पुढे कथन केले की, जाबदेणार यांनी अर्जदार नं. १ व २ यांचे अन्न, वस्त्र, निवारा व औषधोपचाराची कोणतीही व्यवस्था केलेली नाही. अर्जदार नं. १ यांचेकडे कायमस्वरूपी उत्पन्नाचे कोणतेही साधन उपलब्ध नसल्याने अर्जदार नं. १ यांचेवर त्यांची स्वतःची व अर्जदार नं. २ हिचे दैनंदिन गरजांकरीता त्याचप्रमाणे अर्जदार नं. २ हिचे पालन पोषणाची, औषधोपचाराची देखील जबाबदारी आहे. अर्जदार नं. २ हिस वातावरणातील बदलांमुळे उद्भवणाऱ्या किरकोळ आजारपणाकरीता व औषधोपचाराकरीता पैशांची आवश्यकता असते त्याची देखील कोणत्याही प्रकारची तरतुद जाबदेणार यांनी केलेली नाही.

४. अर्जदाराने पुढे कथन केले की, जाबदेणार क्र. १ हा सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून विवाहापूर्वी सुमारे ८ वर्षे नोकरीस होता. विवाहानंतर देखील म्हणजेच आज रोजी देखील जाबदेणार हे वर नमूद कंपनीमध्ये नोकरीस आहे परंतू ते घरातूनच सदर कंपनीचे

नोकरीचे काम करीत असतात. जाबदेणार यांस सुमारे रुपये १,००,०००/– दरमहा इतके वेतन मिळते. जाबदेणार नं. १ यांचे वडील म्हणजेच जाबदेणार नं. २ हे नोकरीतून सेवानिवृत्त झालेले आहेत, त्यांना देखील दरमहा सुमारे रुपये ४०,०००/– इतके निवृत्ती वेतन मिळत आहे. जाबदेणार नं. २ व ३ हे त्यांचे मिळणाऱ्या पेंशनमध्ये त्यांचा उदरनिर्वाह व्यवस्थितरित्या करीत आहेत. त्यामुळे जाबदेणार नं. २ व ३ यांची जबाबदारी कोणावरही नाही. जाबदेणार यांचे स्वतःचे घर आहे, त्याचप्रमाणे नेक्सॉन ही गाडी आहे. एकंदर जाबदेणार यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत चांगली होती व आहे. जाबदेणार यांचे वार्षिक उत्पन्न सुमारे १८,००,०००/– ते २०,००,०००/– इतके आहे. जाबदेणार यांची अर्जदार हिस स्वतंत्र पोटगी देण्याची ऐपत आहे परंतू जाबदेणार हा अर्जदार न. १ व २ यांचा सांभाळ करण्यास नकार देत आहे. त्यांचे अन्न, वस्त्र, निवारा अथवा चरितार्थाची कोणतीही सोय केलेली नाही. जाबदेणार यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत चांगली आहे.

५. अर्जदाराने पुढे कथन केले की, अर्जदार नं. १ ही सुशिक्षित स्त्री आहे. जाबदेणार यांनी अर्जदार नं. १ हिचा शारिरीक व मानसिक छळ केलेला असल्याने अर्जदार नं. १ हिचे मनावर प्रचंड आघात झालेला आहे, ती सध्या झेंडेवाडी याठिकाणी तात्पुरत्या स्वरूपाची नोकरी करीत आहे, तिला दरमहा रूपये १०,०००/– इतके वेतन मिळते परंतू अर्जदार नं. १ ही अर्जदार नं. २ हिचे समवेत तिच्या आई वडिलांपासून स्वतंत्र भाडेतत्वावर खोली घेऊन रहात आहे, तिला दरमहा भाडे रक्कम रूपये ६,०००/– द्यावे लागते. त्याचप्रमाणे अर्जदार नं. २ ही लहान असल्याने तिच्या औषधोपचाराकरीता तिचा सांभाळ करण्याकरीता नोकरीचे पैशांतून राहिलेली रक्कम रुपये ४,०००/– ही पुरेशी होत नाही त्याचप्रमाणे अर्जदार नं. १ हिला सासवड येथून झेंडेवाडी याठिकाणी नोकरीकरीता मिळेल त्या वाहनाने जावे लागत असल्याने त्याचा देखील खर्च होत आहे. अर्जदार नं. १ हिचे नोकरीतून मिळणाऱ्या रकमेतून अर्जदार नं. १ व २ यांचा चरितार्थ भागू शकत नाही, याउलट जाबदेणार यांची आर्थिक परिस्थिती चांगली होती व आहे. अर्जदार नं. १ ही उच्चशिक्षित स्त्री असल्याने

तिचे रहाणीमान देखील उच्च आहे परंतू चरितार्थाचे साधन अपुरे असल्याने अर्जदार नं. १ व २ यांना हालाखिमध्ये दिवस भागवावे लागत आहे.

६. जाबदेणार नं. १ हा देखील उच्च शिक्षित आहे त्याला चांगल्या पगाराची नोकरी आहे, सर्व सुविधांयुक्त घर आहे, गाडी आहे परंतू जाबदेणार नं. १ याने अर्जदार यांचा मानसिक व शारिरीक छळ करून घरातून बाहेर काढून अर्जदार यांचा सांभाळ करण्यास नकार दिलेला आहे, त्यामुळे अर्जदार यांचेवर उपासमारीची वेळ आलेली असल्याने व त्यांचेकडे कोणतेही उत्पन्नाचे साधन नसल्याने व मुळ अर्ज चालणेस उशीर होणार असल्याने अर्जदार यांना जाबदेणार यांचेकडून तुर्तातुर्त पोटगी मिळणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक असल्याने जाबदेणार यांचेकडून तुर्तातुर्त पोटगीची प्रत्येकी रक्कम रूपये १०,०००/– मिळणेकरीता विनंती केली आहे.

७. सदर अर्जावर जाबदेणार क्र. १ ते ४ यांनी नि. १३ खाली म्हणणे दाखल करुन कथन केले की, अर्जदार क्र. १ व २ सोबत असलेले नातेसंबंध त्यांनी मान्य केले आहेत. अर्जातील इतर सर्व मजकूर नाकारलेला आहे.

८. जाबदेणार यांनी कथन केले आहे की, अर्जदार व जाबदेणार यांचा विवाह कोव्हीड–१९ च्या काळात झालेला असून अर्जदाराच्या वडिलांनी लग्नामध्ये कोणताही विशेष खर्च केला नाही. मोजक्या लोकांच्या उपस्थितीत लग्न झाले असून जाबदेणार क्र. २ व ३ यांनी अर्जदार हिस ७ ते ८ तोळे सोन्याचे दागिने दिले होते. विवाहानंतर अर्जदाराने सहा महिने कसाबसा संसार केला. त्यानंतर ती छोटया मोठया कारणांवरुन भांडण करत असे, उध्दटपणे उलट बोलत असे. अर्जदार क्र. १ ही हेकेखोर आणि भांडखोर आहे. अर्जदार ही घरातील छोटया मोठया कामात देखिल जाबदेणार क्र. ३ यांना मदत करत नसे. याउलट, जाबदेणार क्र. ३ यांना चापट बुक्यांनी मारहाण केली. जाबदेणार क्र. १ यांनी अर्जदार क्र. १ हीस समजावून सांगितल्यावर अर्जदाराने आत्महत्या करण्याची धमकी दिली.

९. सन–२०२१ साली मकर संक्रातीच्या दिवशी अर्जदाराच्या आईचे ऑपरेशन असल्याने जाबदेणार हा अर्जदाराला सोडण्यासाठी माहेरी गेला होता, तेव्हा अर्जदाराने तिच्या कुंटुंबियासमक्ष जाबदेणार यांचा अपमान केला. जाबदेणाराला अपमानीत करुन दमदाटी केली. तसेच तिच्या भावाच्या कॉलेजची फी भरण्यासाठी पैसे घेतले आणि जाबदेणाराला हाकलून लावले. त्यानंतर फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवडयामध्ये अर्जदारास समजूत घालून नांदावयास नेले. अर्जदार ही गरोदर राहिल्यावर तिच्या वागणूकीमध्ये विचित्र बदल झाले. अर्जदार ही जाबदेणार यास आई–वडिलापासून विभक्त राहायला सांगत होती. अर्जदाराचे बहिणीचे लग्न अचानक ठरल्यामुळे तसेच त्यावेळी कोव्हीड कालावधी असल्याने वैद्यकीय पुर्तता करुन अर्जदाराच्या जाण्याची व्यवस्था केली. परंतु जाबदेणार यांच्या भावकीतील व्यक्ती मयत झाल्याने अर्जदाराला बहिणीच्या साखरपुडयास जाता आले नाही. त्याचा राग मनात धरुन अर्जदाराने जाबदेणार यांच्यासोबत टोकाचे वाद घातले.

१०. त्यानंतर दिनांक १२.०६.२०२१ रोजी अर्जदाराचे आई–वडिल तिला घ्यायला आले. तेव्हा त्यांनी अर्जदारास जाबदेणार छळ करतात, मारहाण करतात असे खोटे आरोप करुन जाबदेणार यांची छळवणूक केली व हुंडा मागितल्याची खोटी तक्रार करु अशी धमकी दिली. दरम्यानच्या काळात अर्जदाराने जाबदेणाराचा मोबाईल नंबर ब्लॅक लिस्टमध्ये टाकला होता. तिचा व जाबदेणाराचा संपर्क होत नव्हता. अर्जदाराचे नातेवाईकांनी जाबदेणाराचे नातेवाईकांना खोटी माहिती देवून त्यांची बदनामी केली. दिनांक ०९.१२.२०२१ रोजी अर्जदाराला मुलगी झाल्याचे समजल्यावर जाबदेणार हे मिळेल त्या वाहनाने दवाखान्यामध्ये आले. तीन दिवस जाबदेणार तिच्यासोबत होते. बाळंतपणाचा खर्च जाबदेणार यांनी केला. त्यावेळी अर्जदाराची आई व बहिण यांनी जाबदेणारास अपशब्द वापरुन अपमानीत केले. त्यानंतर जाबदेणार यांची आई व बहिण बाळास भेटायला गेल्यावर अर्जदार व तिच्या कुटुंबियांनी त्यांच्याशी वाद घालून दमदाटी केली. अर्जदाराने जाबदेणार यास सांगितले की, पुणे किंवा सासवड येथे राहायला तयार आहे किंवा घटस्फोट देवून टाका.

११. जाबदेणार याचे पुढे कथन आहे की, दिनांक १५.०१.२०२२ रोजी अर्जदाराच्या वडिलांनी बोलणी करण्यासाठी बोलावले होते तेव्हा त्यांनी जाबदेणार यास शिवीगाळ करुन अपमानीत केले व घटस्फोटाची मागणी केली. जाबदेणार यांनी नातेवाईकामार्फत मध्यस्थी करुन अर्जदार हिस नांदावयास आणले. परंतु अर्जदाराच्या वागण्यात बदल झाला नव्हता. तरी देखिल मुलीकडे जाबदेणार सर्व त्रास सहन करत होता. जाबदेणार यांनी तिच्या भाचीला वाढदिवसानिमित्त सायकल भेट दिली. त्यावरुन अर्जदाराने माझ्या मुलीला आताच सायकल आणून द्या असा हट्ट केला. दिनांक ०२.०५.२०२३ रोजी अर्जदाराचे आईने अर्जदाराला देवदर्शनासाठी न्यायचे आहे असे सांगून अर्जदाराला भांडण तंटा करुन घेवून गेले. त्यानंतर जाबदेणाराने अर्जदाराला कुरीअर मार्फत भेटवस्तू पाठविल्या. स्वतः मुलीस भेटवस्तु घेवून गेले परंतु अर्जदार यांनी जाबदेणारास अपमानीत केले. त्यावेळी अर्जदार ही रक्कम रुपये ३५,०००/– पगाराची नोकरी करत असल्याचे तिने सांगितले.

१२. जाबदेणार यांनी पुढे कथन केले की, अर्जदार हिने जाबदेणार यांचा जाणिवपूर्वक त्याग केला आहे. त्यानंतर जाबदेणार यांनी अनेक मध्यस्था मार्फत अर्जदार हिला नांदायला येण्याकरिता अनेक प्रयत्न केले, परंतु अर्जदार ही नांदायला येण्यास स्पष्ट नकार दिला व मध्यस्थानाही अपशब्द वापरून त्यांचाही अपमान केला. मागील काही महिन्यांपासून अर्जदार ही जाबदेणार सोबत कधीही नांदण्याकरिता परत आलेली नाही. अर्जदार हिने जाबदेणार यांचा विनाकारण त्याग करून त्यास संसारीक सुखापासून तसेच मुलांच्या प्रेमापासून वंचित ठेवलेले आहे. जाबदेणारांचा अर्जदारासोबत नांदण्याचा हेतु प्रामाणिकपणाचा होता व आहे. परंतु अर्जदार हिने नांदण्यास येण्याकरिता स्पष्ट नकार दिला.

१३. जाबदेणार यांनी पुढे कथन केले की, अर्जदार ही आर्थिकदृष्ट्या सक्षम असून ती सासवड येथे नामांकीत कंपनी गिरमे टेक्नॉलॉजी प्रा. लि. पुरंदर गट नं. ३१७, पुणे सासवड रोड, पालखी विसावा समोर, झेंडेवाडी येथे नोकरीस असून तिस रुपये ३५,०००/–

ते ४०,०००/– प्रतिमहा व इतर राहणे, दळणवळणासाठी मासिक भत्ता मिळतो. तसेच अर्जदार ही शिवणकाम तसेच विणकाम या कलेमध्ये पारंगत असून तिच्या वडिलांचा टेलरींगचा व्यवसाय असून अर्जदार ही स्वतंत्र महिला टेलरींग तसेच फॅशन डिझाईनिंग व ब्युटी पार्लर, मेकअप अर्टिस्टचे व्यवसाय करत असल्याने त्यापासून तिला रुपये १५,०००/– ते २०,०००/– प्रतिमहा एवढा मोबदला मिळतो. तसेच अर्जदार ही राहण्या खाण्यासाठी तिच्या आई वडिलांच्या घरी राहत असून तिच्या वडिलांचा टेलरिंगचा व्यवसाय असून गावाकडे बागायती शेती देखील आहे. अर्जदार हिचे वडिल, भाऊ व इतर कुंटुंबिय आर्थिकदृष्ट्या सबळ व सक्षम आहे

१४. जाबदेणार यांनी पुढे कथन केले की, जाबदेणार यांची आर्थिक परिस्थिती हलाकीची असून त्यांच्या पाठीमागे वडिलांचे आजारपण व आजारपणासाठी घेतलेल्या लोकांकडून उसने पैशांची परतफेड तसेच रुपये २०,००,०००/– चे हातऊसने कर्ज, अर्जदार हिच्या हट्टापोटी ऐपत किंवा परिस्थीती नसताना घेतलेल्या कारचे कर्ज व तिचा येणारा रुपये २०,०००/– प्रतिमहा हप्ता जाबदेणार यांच्या वडिलांचे झालेले ऑपरेशन व त्यांचा पुढील वैद्यकीय रुपये १५,०००/– ते २०,०००/– प्रतिमहिना खर्च व मासिक औषधोपचार व दैनंदिन मुलभूत गरजा या सर्व जबाबदाऱ्या जाबदेणार यांना स्वतःलाच भागवाव्या लागतात. सदरचा अर्ज जाबदेणार यांना त्रास होईल, त्यांच्या कुटुंबाची मानसिक खच्चीकरण होवून समाजात त्यांची बदनामी व्हावी या दृष्टिकोनाने दाखल केला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज दंडासह नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली.

१५. दोन्ही विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

१६. अर्जदार व जाबदारचे कथनावरुन त्यांना नातेसंबंध मान्य असल्याचे स्पष्ट होते. अर्जदाराने अर्जामध्ये कथन केले आहे की, लग्नानंतर जाबदेणार यांनी तिला कौटुंबिक हिंसाचार केला, तिला जेवणामध्ये मिट टाकले नाही, तुझ्या आईबापाने तुला कामधंदा

शिकवला नाही, तु माठाड आहेस, तुला निट कपडयाच्या घडया घालता येत नाहीत, तु जेवण बनवू नकोस, तु केवळ धुणीभांडी करण्याच्या लायक आहेस, असे अपशब्द वापरले. जाबदेणार हे अर्जदार क्र. १ हिस व्यवस्थीतपणे जेवण देत नव्हते. घरातील कोणत्याही वस्तुला विचारल्याशिवाय हात लावायचा नाही असे जाबदेणार क्र. ३ या तिला म्हणत असत. जाबदेणार क्र. १ हे अर्जदाराशी व्यवस्थीत बोलत नव्हते, तिला काय हवे नको याची विचारपूस करत नव्हते, तु फक्त पैशांसाठी माझ्याशी लग्न केले आहेस, तु माझ्या आईकडे पैसे माग मी तुला एक रुपयाही देवू शकत नाही, तु माझी आई सांगेल त्याप्रमाणे तुला वागावे लागेल, तु आमच्या घरामध्ये राहण्यास लायक नाहीस, तुझ्या बापाने आम्हांला लग्नामध्ये काहीही दिलेले नाही, तुला तुकडा घालायला आमच्याकडे पैसे नाहीत असे म्हणून अंगावर मारण्याकरीता धावून येत होते, जाबदेणार क्र. १ याने अर्जदाराला केसांना धरुन बाहेर काढण्याचा प्रयत्न केला व तिला मारहाण केली व तिला जिवे मारण्याचा प्रयत्न केला. जाबदेणार क्र. १ हा त्याच्या मनासारखी गोष्टी न घडल्यास अर्जदाराला धमकी देत असे की शॉक लावून घेतो, मरतो, फाशी घेतो, जाबदेणाराच्या वर्तणुकीमुळे अर्जदाराच्या मनावर आघात झाला होता.

१७. अर्जदार ही गरोदर राहिल्यानंतर जाबदेणार यांच्या वागण्यांमध्ये बदल झाला नाही. जाबदेणार यांनी अर्जदार हीस दिनांक १८.०६.२०२१ रोजी घराबाहेर काढले त्यामुळे अर्जदार ही नाईलाजास्तव माहेरी गेली. अर्जदाराने तिच्या अर्जातील कथनापृष्ठयर्थ प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. तसेच कौटुंबिक घटना अहवालामध्ये याबाबत नमूद केलेले आहे. यावरुन प्रथमदर्शनी कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे दिसून येते. त्यामुळे जाबदार क्र. १ हा अर्जदारचे पालनपोषण करण्यास बांधील आहे. अर्जदाराच्या कथनानुसार, ती नोकरीतून दरमहा रक्कम रुपये १०,०००/– एवढे वेतन मिळवते. अर्जदार क्र. २ ही अर्जदारासोबत राहते. अर्जदाराने तिच्या मालमत्ता व दायित्व प्रतिज्ञापत्रामध्ये तिचे उत्पन्न दरमहा रुपये १०,०००/– असल्याचे नमूद केले आहे. तसेच तिचा व मुलीचा सर्वसाधारण मासिक खर्च रक्कम रुपये २०,०००/– ते २५,०००/– असल्याचे नमूद केले आहे. जाबदारने त्याच्या मालमत्ता व दायित्व प्रतिज्ञापत्रामध्ये त्याला मासिक पगार रक्कम रुपये ८०,०००/– एवढा मिळत

असल्याचे नमुद केले आहे व त्यास दरमहा रक्कम रुपये १५,०००/– इएमआय वाहन कर्ज आहे. त्याचे रक्कम रुपये १०,००,०००/– कर्ज बाकी आहे, याशिवाय जाबदेणार यास वृध्द आई–वडिलांचा खर्च रक्कम रुपये १५,०००/– ते २०,०००/– प्रत्येकी असल्याचे नमूद केले आहे. या व्यतिरिक्त जाबदेणार यांना त्यांच्या नोकरीतून जास्त उत्पन्न मिळत असल्याबाबत अर्जदाराने पुरावा दिलेला नाही.

१८. मुळ अर्जावर दोन्ही बाजुचा पुरावा देवुन निकाल लागण्यास बराच कालावधी लागणार आहे. त्यामुळे अर्जदार यांना दरम्यानची पोटगी देणे आवश्यक आहे. जाबदाराच्या कथनाप्रमाणे त्याचेवर आई–वडीलांची जबाबदारी आहे. परंतु, त्यामुळे जाबदार क्र.१ यास पत्नी व मुलीची जबाबदारी नाकारता येत नाही. अर्जदार नोकरी पासून उत्पन्न मिळवते परंतु तेवढया उत्पन्नामध्ये अर्जदार क्र. १ व २ यांचा उदरनिर्वाह होवू शकत नाही, त्यामुळे अर्जदारास उत्पन्न मिळते असा बचाव घेवून जाबदार त्याची जबाबदारी नाकारू शकत नाही. त्यामुळे जाबदार क्र.१ पोटगी देण्यास बांधील नाही असे म्हणता येणार नाही. जाबदाराने त्याचे उत्पन्नाचे व दायित्वाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. त्यावरुन त्याची आर्थिक कुवत व त्याच्यावरील जबाबदा–या स्पष्ट होतात.

१९. जाबदार क्र.१ यास नोकरीतून उत्पन्न मिळते. अर्जदार व जाबदार यांचे वय, दैनंदिन खर्च, वैद्यकीय खर्च, जाबदाराच्या जबाबदा–या, अर्जदार व जाबदेणार यांचे राहणीमान, अर्जदार क्र. २ चे वय, शैक्षणिक खर्च पाहता, मुळ अर्जाचा निकाल होईतोपर्यत जाबदार क्र.१ याने अर्जदार क्र. १ व २ यांना दरमहा प्रत्येकी रक्कम रु.१०,०००/– देण्याचा आदेश करणे योग्य वाटते. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आ दे श</u>

**१.** अर्जदाराचा अर्ज मंजूर करणेत येत आहे.

**२.** जाबदार यांनी अर्जदार क्र. १ चा कौटुंबिक छळ संज्ञेअंतर्गत समाविष्ट कोणत्याही प्रकारचा छळ करु नये अशी ताकीद देण्यात येते.

३. जाबदार क्र.१ यास असे आदेशित करणेत येते की, त्याने अर्जदार क्र. १ व २ यांना तुर्तातुर्त पोटगीची रक्कम म्हणून प्रत्यकी दरमहा रूपये १०,०००/- (अक्षरी दहा हजार रुपये मात्र) अर्ज दाखल तारखेपासून ते मुळ अर्ज निकाली होईपर्यंत द्यावेत.

SEEMA KETAN DESHMUKH

Digitally signed by SEEMA KETAN DESHMUKH Date: 2026.02.13 17:57:49 +0530

दिनांक ०९/०१/२०२६

**(सौ. एस. के. देशमुख)**

ठिकाण सासवड.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सासवड.